# स्त्रीची कुचंबणा

काय मित्रांनो कसे आहात ? विषय वाचून बुचकळयात पडलात ना ? मी काही स्त्री मुक्तीसंघटनेचा पदाधिकारी नाहीये. हा विषय माझ्या वेबसाईट बघितलेल्या एका स्त्रीने सुचविला. बरेच दिवस निघून गेले व आज त्या विषयावर लिहण्याचा निश्च्चय केला.

लिहायला सुरवात करतानाच बरेच वर्षापूर्वी वाचलेल्या एका गोष्टीची आठवण प्रकार्षाने झाली. थांबा ! प्रथम ती गोष्टच तुम्हाला सांगतो.

एका प्रेमळ जोडप्याला सुरेख मुलगा होतो. मुलगा खुपच हुशार असतो. त्याचा पाचवा वाढदिवस धुमधडाक्यात साजरा होतो. एक दिवस हा मुलगा आपल्या वडिलांना विचारतो की बाबा आई कधीतरी अचानक का रडते ? खरेतर इतरही बायका अशाच का रडतात ? वडिलांना आश्र्चर्यचा धक्काच बसतो. खरेतर हा प्रश्न त्यांना कधीच पडलेला नसतो. ते सांगतात की बाळा मला उत्तर माहीत नाही.

मुलगा मोठा होतो. त्याला काही ह्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नसते. मग तो मुलगा ( आता तरूण झालेला असतो ) देवाकडे जातो व देवालाच प्रश्न विचारतो कि काही बायका अधून मधून किंवा काही बायका बरेच वेळा का रडतात ? देवालाही प्रश्न विचारण्यातील साधेपणा बघून बरे वाटते व तो उत्तर देतो. ते उत्तर असे असते.

देव म्हणतो कि माझ्यासाठी पुरूष व स्त्री सारखेच आहेत. पण मी स्त्रीला थोडी जास्त वैशिष्टये दिली आहेत.

शारिरीक पातळीवर कदाचित स्त्री पुरूषापेक्षा नाजूक असेल पण तिच्या अंगातील इतर गुण मात्र पुरूषाच्या तोडीचे किंवा त्याला मागे टाकतील असे आहेत. स्त्री अत्यंत सोषिक आहे , कामसू आहे , जीवाची पर्वा न करता ती संसारात झोकून देते , सर्वांची काळजी घेते , नव-याला सांभाळून घेते , त्याच्या दोषांवर पांघरूण घालते , घर सांभाळून नोकरी करते व नव-याला संसारात आर्थिक मदत करते , घरच्या जबाबदा-या न कंटाळता पार पाडते. तीच्याकडे सहनशक्तीचा प्रचंड साठा आहे ती माणसे जोडते , पाहुण्यांचे यथोचित स्वागत करते , प्रसंगी आपले माहेरही विसरते , सासू सास-यांनाच आपले आई वडिल मानते , त्यांची सेवा करते.

बाळा हि यादी खरेतर खूप लांबत जाईल. स्त्री संसारातील कष्ट , जबाबदा-या लिलया पार पाडते. हे सर्व गुण , पुरूषात ही असतात पण पुरुष जात्याच आळशी असतो व त्याला सेवा करवून घ्यायला आवडते.

एवढे सगळे कष्ट केल्यानंतर जर का कोणी स्त्रीला म्हणाले कि तू आमच्यासाठी किती कष्ट करतेस तर त्या स्त्रीच्या डोळयात पाणी येते व तीचे मन आनंदाने भरून येते.

मित्रांनो गोष्ट इथेच संपली. मला मात्र गोष्टीचा शेवट व अश्रूंचे कारण फारसे पटले नाही. कारण बरेचवेळा ह्या अश्रुंची किंमत कौतुकाने कोणीही केलेली नसते. खरेतर हे अश्रु ज्या परिस्थितीच्या भोव-यात ती अडकलेली असते त्या हतबलतेतून आलेले असतात.

अर्थात मी तर म्हणेन ह्या अश्रुंना जबाबदार ती स्त्रीच असते. काय मैत्रिणींनो रागावलात ? थांबा. तुम्हाला आणखिन एक सत्यतच सांगतो. मग तुम्ही ठरवा कि माझ्यावर रागावयाचे कि नाही?

स्त्री शक्ती बघून पुरूष नेहमीच थक्क होतो. ती संसारातील , ऑफीसातील , कुटूंबातील सर्व जबाबदा-या लिलया पेलते. ती सर्वांना सुखी ठेवणाचा प्रयत्न करते. जेव्हा तीला ओरडावेसे वाटते तेव्हा ती हसते. जेव्हा तीला रडावेसे वाटते तेव्हा ती गाते. जेव्हा आनंदात असते तेव्हा रडते. जेव्हा घाबरते तेव्हा हसते.ती एकतर्फी प्रेम करते. परतफेढीच्या भावनेतून ती प्रेम करतच नाही.स्त्री फक्त एकच चूक करते व ती चूक म्हणजे ती आपली स्वतःची लायकी , कर्तबगारी विसरते व त्याचाच फायदा किंवा गैरफायदा पुरूषवर्ग घेत असतो.

काय मैत्रिणींनो , दोस्तांनो पटतोय का विचार.असो प्रस्तावना फारच लांबली.

स्त्रीची कुचंबणा खरे तर तीच्या जन्मापूर्वीच सुरू होते. बायकोला दिवस राहिल्याचा आनंद थोडे दिवसच टिकतो. मग सुरू होते चिंता. मुलगा होईल कि मुलगी ? पहिला मुलगा असेल तर फारशी चिंता नसते. पण अन्यथा पहिली मुलगी फारशी रूचत नाही. निदान पांढरपेशा लोकांनातरी. मग अर्थातच सोनोग्राफी केली जाते. मुलगा कि मुलगी होणार हे सांगू नये अशी डॉक्टरवर नैतिक जबाबदारी असते. पण ह्या जमान्यात नैतिकता हा शब्दच विसरला गेलाय. जर मुलगी होणार असे कळले तर मग सगळा मूडच जातो. हल्लीच्या काळात एक किंवा दोन मुले होणार मग पहिली मुलगी होऊन कसे चालेल ? खरेतर मुलगा होणार कि मुलगी होणार हे पुरूषाच्या शुक्रजंतूवर अवलंबून असते पण मुलगी झाल्याला बायकोलाच जबाबदार धरले जाते. मित्रांनो तुम्हाला माहितेय पुरूष व स्त्रीचे प्रमाण? हे प्रमाण साधारणपणे १000 पुरूषांच्या तुलनेत ८५० स्त्रीया असे आहे.याचे कारण तुमच्या लक्षात आले असेलच. ह्या उत्तराची कारणमीमांसा करण्यात मी वेळ घालवू शकत नाही. सूज्ञास वेगळे सांगण्याची गरज नाही.

आता आपण मुलीचे बालपण कसे जाते याचा विचार करूया. घरात जर तीला भाऊ असेल तर दोघांना दिलेल्या वागणुकीत फरक असतो.मुलीवर जास्त नियंत्रणे असतात , कपडे कसे असावेत , संध्याकाळी सातच्या आत घरी येणे आवश्यक , फोनवर जास्त बोलायचे नाही , घरकामात मदत करायची , मोठया मंडळींबरोबर वादविवाद करायचा नाही ,

आकांडतांडव करायचे नाही , सहनशक्ती वाढवायची , कमी हसायचे इत्यादी इत्यादी . ह्याची कारणमीमांसा अशी केली जाते की ह्या गोष्टी मुलीच्या जातीला शोभत नाहीत . शिक्षणात , इतर सोईसवलतीमध्ये , इतर छंद वगैरे गोष्टीतही फरक केला जातो . एकच मुलगी असेल व ती हुशार असेल तर तीला शिकवले जाते . नोकरी करू दिली जाते . पण करीयर करणा–या मुलींच्या पालकांना तीच्या लग्नाची चिंता असते . लग्नाशिवाय आयुष्य अपुरे आहे अशी पालकांची धारणाच असते .

आता लग्न करायला होकार देणा–या मुलींची परिस्थिती समजून घेऊया . मुलगी शिकलेली नसेल व रूपाने बेतास बात असेल तर चांगला नवरा मिळणे कठीणच असते . अर्थात लग्न हा नशिबाचाच खेळ असतो . अशा मुली मग दुकानदार , स्वयंव्यवसायिक व्यक्तींबरोबर लग्नास तयार होतात . अर्थात दिसायला चांगली असेल तर वरपक्षाकडून मागणीची शक्यता असते .

परंतु मुलगा जर शिकलेला असेल तर त्याला शिकलेलीच मुलगी हवी असते . तीच्याकडून नोकरीची अपेक्षा नसते तर घरसंसार करण्याचीच अपेक्षा असते . मित्रमंडळीत मला किती शिकलेली बायको मिळाली अशा फुशारक्या मारता येतात . ही शिकलेली मुलगी सुद्धा बरेच वेळेला केवळ लग्न करून आई वडिलांची जबाबदारीतून सुटका करण्यासाठी लग्नाला तयार होते . अशा मुलीला माहेरी काम करायची सवयच नसते . अभ्यास , कॉलेज , मैत्रिणी ह्या विश्वात घरी आईला मदत करायला वेळच मिळालेला नसतो व जेव्हा ही मुलगी शिकलेल्या तरूणाची पत्नी होऊन घराची जबाबदारी स्वीकारते तेव्हा सुरवातीच्या काळात तीची तारांबळ उडते . नोकरी न केल्यामुळे जे शिकली त्याचा संबंधच लग्नानंतर तुटतो . काही वर्षांनी मुले मोठी झाल्यावर , त्यांची आईची गरज संपल्यावर ह्या गोष्टीचे वैषम्य वाटून तीच्या मनाला त्रास होतो .

लग्न झाल्यावर अर्थातच करीयर साठी वेळ देण्याची सासरच्या मंडळींची तयारी नसते . नव–याची संमती असते पण घरचे , माझे सर्व करून करीयर करायला वेळ मिळाला तरच तू करीयर कर असे स्पष्ट बजावले जाते . बरे बायकोला काही मदत वगैरे करणे नावच नको . कदाचित पुरूषांच्या मनात एक सुप्त इच्छा असते की बायकोने आपल्यापेक्षा वरचढ होता कामा नये .

स्वतंत्र अर्थाजन करत नसल्यामुळे आर्थिक कुंचबणेचे वर्णन करणेच शक्य नाही . नोकरीत २०,००० रू . मिळवणा–या स्त्रीची घरातील कामाची रूपयातील किंमत शून्य असते . घर सांभाळायला बायकोची भक्कम साथ असेल तर पुरुष बाहेरच्या जगात आपले कर्तृत्व सिद्ध करू शकतो . घरातील जबाबदारीची काळजी नसल्यामुळेच हे शक्य होते . पण आज किती पुरूष या गोष्टीचे क्रेडीट बायकोला देतात ?

स्त्रीचा मासिक धर्म व समाजाची त्याकडे बघण्याची दृष्टी हा एक वेगळाच विषय आहे व त्यामुळे होणारी कुचंबणा एखादी स्त्रीच व्यक्त करू शकेल . लग्नानंतरच्या स्त्री – पुरूष संबंधात सुद्धा कुचंबणेचा मोठा अध्याय दडलेला आहे .

आज समाजात स्त्रीकडे एक उपभोग्य वस्तु म्हणून बघण्याची मानसिकता बळावली आहे. आज त्यामुळेच कोणत्याही जाहीरातीत , प्रॉडक्टच्याबरोबरीने कमी कपडे घातलेली स्त्रीच का दाखविलेली असते? अर्थात हल्ली ट्रेंड थोडा बदलत आहे व कमी कपडे घातलेले पुरूष मॉडेलही जाहीरातीत डोकावतात.अर्थात मला एक कळत नाही की अशा जाहीरातीत स्त्री कमी कपडे घालून कामे का करतात ? पोट भरण्यासाठी कि कामाच्या श्रमात मिळणा–या जास्त पैशासाठी ?
क्रिकेटच्या मॅचच्या वेळी नाचायला कमी कपडयातील विदेशातील मुलीच का लागतात ?

जेव्हा घरातील स्त्री आजारी पडते व इतरांवर कामाचा बोजा पडतो तेव्हा सगळयांचीच तारांबळ उडते , कामावरून भांडणे होतात कारण आजपर्यंत निमूटपणे मिळणारी सेवा खंडीत झालेली असते.घरातील प्रत्येकाला कधीएकदा ती स्त्री ( जी कोणाची आई असते , सून असते , बायको असते ) बरी होते असे होते. ह्या काळात जर ती करत असलेल्या श्रमांची किंमत घरातील प्रत्येकाला कळली असेल तर त्या स्त्रीचा पुढचा काळ जरा बरा असू शकतो. पण शेवटी पळसाला पाने तीनच.

नवरा वारल्यानंतर त्या स्त्रीला वेगळया प्रकारच्या कुचंबणेला सामोरे जावे लागते. कालपर्यंत सौभाग्यवती म्हणून मिळणारा मान गायब होतो. सणासुदीला , मंगलकार्याच्या वेळी बंधने येतात , कपडे , हौस मौज करणे शक्य होत नाही. अशी स्त्री जर आर्थिक बाबतीत परावलंबी असेल तर त्या स्थितीचे वर्णनच करता येणार नाही. मग अशा स्त्रीकडून हक्काने कामाची अपेक्षा ठेवली जाते. ही अपेक्षा मुलगा , सून , नातवंडे सर्वच करतात. आर्थिक बाजू सबळ असली तरी एकटे राहण्याची मानसिकता तयार न झाल्यामुळे तीला कोणालातरी धरून रहावे लागते.

ब–याच कुचंबणेसाठी दुसरी स्त्रीच जबाबदार असते. कधी ती आईच्या स्वरूपात , तर कधी सासूच्या स्वरूपात , तर कधी सहाका–याच्या स्वरूपात असेल. एका स्त्रीने दुस–या स्त्रीला समजून घेणे आवश्यक आहे.

प्रत्येक स्त्रीसाठी लग्न हा जीवनाचा अंतिम टप्पा असतो. खरेतर लग्नाशिवाय जीवनाला अर्थ राहत नाही. परंतु केवळ लग्नासाठी लग्न , परिस्थितीतील असलेला फरक लक्षात न घेता केले असेल तर कुचंबणेशिवाय दुसरे काहीच हाती लागणार नाही.

सर्व वयोगटातील होणारे स्त्रीवर्गाचे लैंगिक शोषण हा तर कुचंबणेचा कळस व माणुसकीला काळीमा आणणारा आहे.

वरिल सर्व चर्चा ही साधारणपणे पांढरपेशा सुशिक्षित समाजाची आहे.पण आज समाजात बहुसंख्य लोक अशिक्षित आहेत, अर्धपोटी आहेत. त्या स्त्रींच्या कुचंबणेचे स्वरूप भयानक आहे. अशा बायकांचे आयुष्य हे लहानवयात लग्न , वयाने मोठा नवरा , बहुतेकवेळा व्यसनी , फारसे कामधंदा न करणारा , दर २ वर्षांनी होणारी बाळंतपणे अशा चक्रात गुरभटलेले

असते. प्रसंगी अर्धपोटी राहून आपल्या व्यसनी नव-याला व पिल्लांना जेवू घालण्यासाठी ही स्त्री दिवसभर राब राब राबते.

उच्चवर्गातील बायका ह्या तर बरेचवेळा शोभेच्या बाहुल्या असतात. कुटूंबाच्या प्रतिष्टेसाठी मुलगा लग्न करतो व आयुष्यभर बायकोच्या नशीबी सोन्याचा पिंजरा येतो. बरे कोणाशी सत्य बोलायची चोरी. नव-याबरोबर हातात हात घालून पार्टी , ट्रिप वगैरेला जाणे व तेही हसत मुखाने.दिवसभर घरात कोंडून घेऊन नव-याची भेट रात्री झाली तर नशिबच समजायचे.

पुरूषांनो विचार करा ? कोणत्याही वर्गातील स्त्री असो , सर्व तडजोड तीलाच करावी लागते कारण संसार तीचा असतो. आपले माहेर सोडून ती सासरी येते तेव्हा बरेच वेळा माहेरचे दरवाजे परत येण्यासाठी बंद झालेले असतात. नव-याने टाकलेली , घटस्फोटीत महिलांची अवस्था तर 'न घर का न घाटका' अशी असते. पटले नाही तर घर सोडण्याची सक्ती बाईवरच असते. अशा बायकांकडे बघण्याची समाजाची द्दष्टी फारच कठीण असते. जर का पदरात लहान मुल असेल तर तीची अवस्था फारच बिकट होते.

मित्रांनो या विषयाचा आवाकाच एवढा मोठा आहे कि त्याला शब्दबद्ध करणे हे कठीणच आहे.
अर्थात वरील परिस्थिती प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यात असलेच असे नाही. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील कि ज्यात सासरच्या मंडळीनी , नव-याने भक्कम पाठींबा दिल्यामुळे ह्या स्त्रीयांची करीयर होऊ शकली. उदाहरणे तुमच्या नजरे समोरच आहेत.वरील कुचंबणा खरेतर प्रातिनिधिक आहे. पण जर का तुम्ही विचार केलात तर ती कुचंबणा तुम्ही बघू शकता , त्यावर विचार करू शकता.

तसेतर ब-याच पुरूषांचीही कुचंबणा होत असते. पण तो एका वेगळया लेखाचा विषय आहे.आता प्रश्न असा आहे कि आपण या कुचंबणेतून स्त्रीला सोडवू शकतो की नाही ? ह्याचे उत्तर मी तरी ' हो ' असेच देईन.काय विश्र्वास नाही बसत ? विचार करूया साथ साथ ?
ह्या कुचंबणेला पुरूषाऐवढीच स्त्री ही जबाबदार आहे असे मी सुरवातीलाच सांगीतले आहे.

आज गरज आहे ती स्त्रीने मानसिकता बदलण्याची. पुरूषानेही मानसिकता बदलणे गरजेचे आहे ह्या बद्यल दुमत नाही. स्वतःला नेमके काय हवे आहे हे प्रत्येक स्त्रीने ठरविणे गरजेचे आहे. त्यासाठी किती किंमत मोजण्याची तयारी आहे हे सुद्धा तपासून बघावे लागेल. आपले ध्येय काय आहे? आपण ज्या कष्टाने शिक्षण केले त्याचा जर लग्नानंतर उपयोग होणार नसेल तर आपण आयुष्यातील कमीत कमी २० वर्ष फुकट का घालविली ? याचाही विचार आवश्यक आहे. ह्या सर्व निर्णयप्रकीयेत आई वडिलांचा सहभाग खूपच महत्वाचा आहे. आज आई वडिलांनी सुद्धा मानसिकता बदलण्याची गरज आहे. खरेतर याची तयारी आई वडिलांनी मुलगी झाल्याबरोबर सुरू करण्याची गरज आहे.

आज कुचंबणेचे मुख्य कारम की स्त्री वर्गाची निर्णयक्षमतेची व स्पष्टवक्तेपणाची कमतरता. आज शिकलेल्या नोकरी करण्या-या बायका , बारीक सारीक गोष्टींसाठी नव-याचा सल्ला घेतात. अर्थात ही गोष्ट नव-यांना आवडते हा भाग वेगळा. परंतु स्त्रीने सेकंड ओपीनीयन म्हणून विचारायला हरकत नाही. पण प्राथमिक निर्णय स्वतःच घेण्याची सवय केली पाहिजे. अर्थात ह्यासाठी आई वडिलांनी लहानपणापासून मुलीत हे गुण येण्यासाठी श्रम घेतले पाहिजेत.

पुरूषांनी सुद्धा आपला जन्म हा केवळ सेवा मिळण्यासाठी आहे ही समजूत बदलण्याची गरज आहे. लहानपणापासून पालकांनी मुलगा – मुलगी असा भेदभाव न करता , घरातील सर्व कामांच्यात मुलांचा सहभाग घेतला पाहिजे. प्रत्येकाला प्रत्येक काम शिकवण्यावर भर दिला पाहिजे. अगदी मुलालासुद्धा चहा करणे , कुकर लावणे वगैरे कामे आली पाहिजेत. तसेच भांडी घासणे , कपडे धुणे , कपडे वाळत घालणे ही कामे मुलीने – मुलांनी मिळून करायची सवय लावली पाहिजे.

असे जर का झाले तर पुढे मागे लग्न झाल्यावर हा मुलगा ( जो आता नवरा झाला असेल ) आपल्या बायकोचे श्रम ओळखेल व तीला घरकामात मदत करेल. अर्थात बरेच वेळा घरातील कामे पुरूषाने करणे ह्यात स्त्रीलाच कमीपणा वाटत असतो तो भाग वेगळा. परदेशात स्त्री पुरूष समानतेच्या गप्पा मारल्या जातात. पण Computer Clip Art मध्ये घरकाम करताना एक स्त्रीच दाखविलेली असते.

स्त्रीने जर लग्नापूर्वी जोडीदाराकडून असलेल्या अपेक्षा मनमोकळेपणी सांगितल्या व होणा-या नव-याने त्या मान्य केल्या व स्वतःच्या अपेक्षा होणा-या बायकोला सांगून तीची सहमती घेतली तर पुढील संसारातील बरीच कुचंबणा कमी होईल असा मला विश्र्वास आहे. पण लग्न झाल्यावर त्यावर अंमलबजावणी करणे तेवढेच गरजेचे आहे. लग्नासाठी ह्या अपेक्षांना संमति देऊन नंतर फसवणुक केली जाणार नाही ह्याची खात्री कोण देणार ?

ह्या चर्चेसाठी सुद्धा दोघांच्या आई -वडिलांची मानसिकता महत्वाची ठरते. वडिलधारी मंडळी आपला काळ आठवत बसले तर मग काही खरे नाही.

मित्रांनो उपाय तर आहेत पण अंमल बजावणीची सुरवात कोणापासून ? खरेतर सर्वांकडूनच एकदम ह्या प्रश्र्वावर ‘ हल्ला बोल ’ केला तरच हे शक्य आहे.

मित्रांनो तुम्हाला उत्सूकता असेल ना कि हा लेखक ह्या विषयावर धुरळा उडवतोय, पण ह्याच्या घरी नेमकी परिस्थिती काय आहे ?

मित्रांनो ज्या परिस्थितीत मी लहानाचा मोठा झालो. त्या परिस्थितीनेच स्त्रीची कुचंबणा मला लहानपणीच कळली.
त्या काळी ( १९३० साल) माझी आई सातवी पास झाली होती. इंग्रजी सुद्धा येत होते. तेव्हा शाळेत सातवी पास झाल्यावर D.ED. करून शाळेत मास्तरणीची नोकरी मिळू शकली असती. माझी मावशी अशीच नोकरी करून हेडमास्तरीण म्हणून निवृत्त झाली. परंतु आईला लग्नानंतर नोकरी करता आली नाही. तिचा उमेदीचा काळ स्वयंपाकघरात मुलाबाळांचे , पै पाहुण्याचे व नव-याचे आजारपण काढण्यात गेला. आई ६० वर्षांची असताना वडिल वारले व तिच्या गुणांना त्यानंतर वाव मिळाला.

महिला मंडळाच्या माध्यमातून तीने कथाकथन, गीतापठण वगैरेची बरीच बक्षिसे बरीच वर्षे मिळविली. मुलाबाळांबरोबर भरपूर प्रवास केला व वयाच्या ८५ वर्षी तीला देवाज्ञा झाली.

तिचे कष्ट बघून घरात मदत करण्यास मी नेहमीच पुढे असे. माझी बहिण खूप मोठी असल्यामुळे लग्न होऊन कधीच सासरी गेली होती. त्यामुळे घरात सर्व पुरूषांचे राज्य असे. लहानपणापासून स्वतःचे काम स्वतः करून , घरातले थोडे काम करण्याची सवयच लागली. ती सवय आजपर्यंत वयाच्या ५७ वर्षीही चालू आहे. श्रमप्रतिष्ठा हल्ली शाळेत शिकविली जाते. श्रमप्रतिष्ठेचे बाळकडू आम्हाला लहानपणीच मिळाले.

आमचे घर सहकार तत्वावर चालते. ‘ विनासहकार नाही उद्धार ’ असा आमचा मूलमंत्र आहे. माझी पत्नि ही माझी जवळची व एकमेव मैत्रीण सुद्धा आहे. लग्नानंतर माझ्या सौ.ची कंपनी मुंबईबाहेर गेल्यामुळे तीची नोकरी सुटली. पण तीने माझ्या व्यवसायात , ऑडीट मध्ये भरपूर मदत केली. तसेच Administrative बाजू भक्कमपणे सांभाळली. आज तीचे शिक्षण बेताचे असले तरी ९0% बायकांपेक्षा तीच्याकडे भरपूर नॉलेज आहे. माझ्या आयुष्यातील अनुभव , अगदी ऑडीटचे काम , Survey चे काम मी वेळोवेळी तीच्याबरोबर शेअर केले आहे . त्यामुळे ह्या जगात नेमके काय चालते ह्याची तीला चांगली माहीती आहे. तिचे वाचन अफाट आहे. घरकाम सांभाळून २-३ दिवसात एका पुस्तकाचा फडशा पाडते व मला संपूर्ण कथानक थोडक्यात सांगितल्याशिवाय तीला चैनच पडत नाही. मग त्या पुस्तकातील ठराविक पाने माझ्या वाचनासाठी नमूद करते. मी सुद्धा **English** पुस्तके वाचून तीला गोषवारा सांगतो.
हेच संस्कार आमच्या मुलांवर करण्याचा आटोकाट प्रयत्न केला व त्याचा फायदा त्यानाही त्यांच्या संसारात होत आहे.

काय मित्रांनो वाचून दमलात ? विचार करणार ? **Please ……….**

आपण सर्वजण मिळून ही परिस्थिती बदलण्याचा आजपासून प्रयत्न करूया.